# ANTI - RAGGING REGULATION

Ragging is legally banned. It is a punishable offence. In view of the increasing number of events of ragging, the University Grants Commission has passed the "UGC Regulations on Curbing the Menace of Ragging in Higher Educational Institutions, 2009."

Ragging is any conduct by " any student or students whether by words spoken or written or by an act which has the effect of teasing, treating or handling with rudeness a fresher or any other student, or including in rowdy or in disciplined activities by any student which causes or is likely to cause annoyance, hardship or psychological harm or to raise fear or apprehension there of in any fresher or any other student or asking any student to do any act which such student will not in any ordinary course do and which has the effect of causing or generating a sense of shame, or embarrassment so as to adversely affect the physique or psyche of such fresher or any other student, with or without an intent to derive a sadistic pleasure or showing of power, authority or superiority by a student over any fresher or any other student.

The Anti-Ragging Committee may, depending on the nature and gravity of the guile established by the Anti-Ragging Squad, award, to those found guilty, one or more of the following punishments namely.

- Suspension from attending classes and academic privileges.
- Withholding / withdrawing scholarship / fellowship and other benefits.
- Debarring from appearing in any test / examination or other evaluation process.
- Withholding results.
- Debarring from representing the institution in any regional, national or international meet, tournament, youth festival etc.
- Suspension / expulsion from the hostel.
- Cancellation of admission.
- Rustication from the institution for period ranging from one to four semesters.
- Expulsion from the institution and consequent debarring from admission to any other institution for a specified period.

Provided that where the persons committing or abetting the act of ragging are not identified, the institution shall resort to collective punishment. The students are advised to consult the Anti-Ragging Committee in case of emergency.

# रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम

रॅगिंग करणे हा कायद्यानुसार गुन्हा आहे. रॅगिंगच्या वाढत्या घटनांमुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने २००९ मध्ये रॅगिंग करणाऱ्याला कठोर शिक्षेची तरतुद असलेला अधिनियम प्रसारित केला. रॅगिंगसंदर्भात या विद्यापीठात 'रॅगिंग प्रतिबंधक समिती' स्थापन करण्यात आली असून या अधिनियमाची कठोर अमलबजावणी विद्यापीठात केली जाणार आहे. रॅगिंग हा दुसऱ्या विद्यार्थ्याला शारिरीक किंवा मानसिक क्लेष होईल असे वर्तन करण्याचा एक घृणास्पद अमानवी व विकृत प्रकार आहे. रॅगिंगमुळे निष्पाप विद्यार्थ्यांचे खच्चीकरण तर होतेच, परंतु रॅगिंग मुळे प्रसंगी एखादा विद्यार्थी प्राणासही मुकू शकतो. रॅगिंगमध्ये खालील बाबीचा अंतर्भाव होतो.

नवप्रवेशित विद्यार्थ्याला बालून, लिहून, चिडवून, उद्धटपणे वागून त्याला / तिला मानसिक किंवा शारिरीक इजा पोहचविणे. इतरांची मानहानी करणारे व लज्जा उत्पन्न करणारे वर्तन करणे. नवप्रवेशित विद्यार्थ्यावर वरिष्ठत्वाच्या नात्याने जोर जुलूम करणे, दहशत उत्पन्न करणे, सत्ता प्रस्थापित करणे, त्यांना शिक्षा देणे इ. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे इतर विद्यार्थ्यांना त्रास देणारी कोणतीही कृती करणे.

**रॅगिंग करणाऱ्याला शिक्षा :**

या अधिनियमात रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्याला कठोर शिक्षेची तरतूद आहे. दोषी विद्यार्थ्याला खालीलपैकी एक अथवा अधिक शिक्षेस सामोरे जावे लागेल.

* वर्गात बसणे व इतर शैक्षणिक लाभांपासून वंचित करणे. * शिष्यवृत्ती, फेलोशिप या पासून वंचित करणे. * परीक्षेसाठी अपात्र ठरविणे. * निकाल राखून ठेवणे. * कोणत्याही युवक महोत्सव, टुर्नामेंटमध्ये सहभाग घेण्यास प्रतिबंध करणे. * एक ते चार सत्रापर्यंत निलंबीत करणे. * शिक्षण संस्थेतील प्रवेश रद्द करणे, तसेच इतर कोणत्याही शिक्षण संस्थेत कांही काळासाठी प्रवेशापासून वंचित करणे.

**आणीबाणीच्या प्रसंगी विद्यार्थी / विद्यार्थीनींनी रॅगिंग प्रतिबंधक समितीकडे संपर्क साधावा.**